दिनेश
बिल्डींग मटेरियल सप्लायर्स
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर, वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक (सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368, 9860330587

दैनिक
आकर्षण
संपादक : विजय सांगळे

वर्ष ५ ▪ अंक २७७ ▪ मंगळवार ४ ऑगस्ट २०२६ ▪ पाने ४ ▪ मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

जिल्हा पोलीस दलातर्फे गुरुवारी अंमली पदार्थविरोधी जनजागृती रॅली

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांची पत्रकार परिषदेत माहिती

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– तरुण पिढीला व्यसनाधीनतेच्या विळख्यातून बाहेर काढण्यासाठी आणि संपूर्ण जिल्हा ड्रग्जमुक्त करण्यासाठी जिल्हा पोलीस दलाच्या वतीने गुरुवार, ६ ऑगस्ट रोजी भव्य अंमली पदार्थ विरोधी जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. ही रॅली सकाळी ७:३० वाता पोलीस मुख्यालय येथून निघणार आहे. पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी मंगळवारी सायंकाळी पोलीस मुख्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत याबाबतची सविस्तर माहिती दिली व तरुण पिढीला व्यसनमुक्तीकडे नेण्यासाठी पोलीस दलातर्फे हे पाऊल उचलण्यात आल्याचे सांगितले.

जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे आणि शहर विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. दिलीप टिपरसे यांच्या विशेष मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबवला जात आहे. समाजात व्यसनमुक्तीबद्दल ▪ पान ४ वर

तरुण पिढीच्या भविष्यासाठी नशामुक्तीची सामूहिक शपथ

रॅलीच्या दरम्यान उपस्थित सर्व घटकांना नशामुक्तीची सामूहिक शपथ दिली जाणार आहे. अंमली पदार्थांचे सेवन केवळ एका व्यक्तीलाच नव्हे, तर संपूर्ण कुटुंबाला आणि समाजाला उद्ध्वस्त करते, त्यामुळे या सामाजिक समस्येविरुद्ध लढा उभारणे ही प्रत्येकाची जबाबदारी असल्याचे पोलीस प्रशासनाने म्हटले आहे.

अंमली पदार्थ विक्रीला पाठबळ देणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांना बडतर्फ करणार

अंमली पदार्थ विक्रेते यांच्यावर गुन्हे दाखल झाल्यानंतर ते नंतर कायदेशीर कारवाई झाल्यावर पुन्हा विक्री सुरू करतात, असे बहुतांश वेळा दिसून येते. त्यामुळे आपापल्या पोलीस ठाण्यांच्या हद्दीत अशा विक्रेत्यांवर वचक बसावा, यासाठी अधिकाऱ्यांनी ठाम भूमिका घेणे गरजेचे आहे. परंतु स्थानिक पोलीस ठाण्यांचे अधिकारी-कर्मचारी याकडे दुर्लक्ष करीत असल्याकडे पत्रकारांनी लक्ष वेधले असता, एसपी सुदर्शन यांनी अंमली पदार्थ विक्रेत्यांना पाठीशी घातल्याचे आढळून आल्यास अशा पोलीस अधिकारी-कर्मचाऱ्यावर थेट बडतर्फीची कारवाई करणार असल्याचे स्पष्ट केले.

अंमली पदार्थ सेवन प्रकरणी सात महिन्यांत ३६५ गुन्हे दाखल

पत्रकार परिषदेत माहिती देताना एसपींनी सांगितले की, दिनांक १ जानेवारी ते ३१ जुलै २०२६ या सात महिन्यांच्या कालावधीत अंमली पदार्थ बाळगणे, लागवड, वाहतूक व सेवन प्रकरणी पोलिसांनी धडक कारवाई करत एकूण २९७ गुन्हे दाखल केले असून ३५५ आरोपींना ताब्यात घेतले आहे. या संपूर्ण कारवाईत ६४० किलो १७७ ग्रॅम ५९९ मिलीग्रॅम इतक्या मोठ्या प्रमाणावर अंमली पदार्थ जप्त करण्यात आले असून, जप्त साठ्याची एकूण किंमत १ कोटी ७८ लाख ५७ हजार ८१० रुपये इतकी आहे. या कारवाईत अंमली पदार्थांची वाहतूक, लागवड व विक्रीप्रकरणी ३२ गुन्ह्यांमध्ये ५९ आरोपींवर कारवाई करण्यात आली. तसेच अंमली पदार्थांचे सेवन करणाऱ्यांविरुद्ध ३६५ गुन्हे नोंदवून २९६ जणांवर कारवाईचा बडगा उगारण्यात आला आहे.

रिक्षा-टॅक्सी चालकांच्या प्रश्नांसाठी नेहमीच खंबीरपणे उभा राहीन; आमदार संग्राम जगताप यांचा नागरी सत्कार

खासगी प्रवासी वाहतूक आणि वाहतूक शिस्तीबाबत संयुक्त बैठक घेऊन कायमस्वरूपी तोडगा काढणार - आमदार संग्राम जगताप

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– अहिल्यानगर शहराच्या विकासात मोलाचे योगदान देत शहराचा चेहरामोहरा बदलणारे, रिक्षा व टॅक्सी चालक-मालकांच्या विविध प्रश्नांवर सातत्याने पाठपुरावा करणारे आमदार संग्राम जगताप यांचा अहिल्यानगर जिल्हा ऑटो रिक्षा व टॅक्सी चालक-मालक संघटनेच्या वतीने भव्य सत्कार करण्यात आला. शहरातील रस्त्यांचे काँक्रिटीकरण, विविध रिक्षा स्टॅण्डचे सुशोभीकरण, कोरोना काळातील मदतकार्य, राष्ट्रीय महापुरुषांच्या पुतळ्यांचे सुशोभीकरण आणि शहराच्या सर्वांगीण विकासासाठी दिलेल्या योगदानाबद्दल हा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला संघटनेचे अध्यक्ष नगरसेवक अविनाश घुले, माजी उपमहापौर गणेश भोसले, नगरसेवक प्रकाश भागानगरे, माजी सभापती कुमार वाकळे, ज्ञानदेव पांडुळे, बाली बांगरे, अजय चितळे, वैभव ढाकणे, गोरख पडोळे संघटनेचे कार्याध्यक्ष विलास कराळे, उपाध्यक्ष दत्ता वामन, उपाध्यक्ष सुधाकर साळवे, उपाध्यक्ष नासिर खान यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी व असंख्य रिक्षाचालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रारंभी संघटनेचे कार्यध्यक्ष विलास कराळे यांनी प्रास्ताविक करताना संघटनेच्या स्थापनेपासून आजपर्यंतच्या वाटचालीचा आढावा घेतला. रिक्षा चालकांच्या न्याय्य प्रश्नांसाठी संघटना सातत्याने संघर्ष करत असून प्रत्येक वेळी आमदार संग्राम जगताप यांनी सकारात्मक भूमिका घेतली असल्याचे त्यांनी सांगितले. शहरातील रिक्षा स्टॅण्डचे काँक्रिटीकरण, रस्त्यांची सुधारणा, विविध प्रशासकीय प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी दिलेले सहकार्य रिक्षा चालक कधीही विसरणार नाहीत. संघटनेचे बळ हे चालकांच्या एकजुटीत असून भविष्यातही संघटना सर्वसामान्य रिक्षा चालकांच्या हितासाठी काम करत राहील, असा विश्वास

कराळे यांनी व्यक्त केला.

संघटनेचे अध्यक्ष नगरसेवक अविनाश घुले यांनी सांगितले की, एकेकाळी शहरातील अनेक रस्त्यांची अत्यंत दयनीय अवस्था होती. खराब रस्त्यांमुळे रिक्षांची मोठ्या प्रमाणात दुरुस्ती करावी लागत होती आणि चालकांचा खर्च वाढत होता. मात्र आमदार संग्राम जगताप यांच्या पुढाकारामुळे शहरातील बहुतांश रस्त्यांचे काँक्रिटीकरण झाले असून ३० ते ३५ वर्षे टिकणारे दर्जेदार रस्ते नागरिकांच्या सेवेत आले आहेत. जीपीओ रिक्षा स्टॅण्ड, पर्सनल गेट रिक्षा स्टॅण्ड, छत्रपती शिवाजी राजे चौक, माळीवाडा बसस्थानक रिक्षा स्टॅण्ड, पुणे बसस्थानक आऊटगेट रिक्षा स्टॅण्डसह विविध ठिकाणांचे काँक्रिटीकरण झाल्याने रिक्षाचालकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

घुले पुढे म्हणाले की, शहराच्या ▪ पान ४ वर

शेतातील महिलांचे दागिने लांबविणारी टोळी जेरबंद

एलसीबीच्या कारवाईत साडेचार लाखांचा मुद्देमाल जप्त । चार गुन्ह्यांची उकल

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– शेतात काम करणाऱ्या महिलांचे मंगळसूत्र व सोन्याचे दागिने जबरीने लांबवणाऱ्या टोळीचा स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पर्दाफाश केला आहे. या कारवाईत पोलिसांनी तीन आरोपींना अटक केली असून, त्यांच्याकडून ४ गुन्हे उघडकीस आणत एकूण ४ लाख ५१ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

दिनांक २९ जुलै रोजी खडकी (ता. नगर) रस्त्याने जाणाऱ्या केशर कोठुळे या महिला फिर्यादीचे दागिने अज्ञातांनी हिसकावून नेले होते. नगर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर ▪ पान ४ वर

पथकात यांचा सहभाग

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे तसेच तपास पथकातील सपोनि हरीश भोये, अंमलदार फुरकान शेख, किशोर शिरसाठ, अमोल कोतकर यांनी केली.

अल्पसंख्याकांच्या विकासासाठी खा. लंके आक्रमक

सामाजिक-आर्थिक उन्नतीसाठी केंद्राकडे ठोस प्रस्ताव

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– अहिल्यानगर (दक्षिण) लोकसभा मतदारसंघातील अल्पसंख्याक बहुल भागांमध्ये शिक्षण, आरोग्य, पिण्याचे पाणी, स्वच्छता, रस्ते, कौशल्य विकास आणि इतर मूलभूत सुविधा सक्षम करण्यासाठी पंतप्रधान जन विकास कार्यक्रम अंतर्गत विविध विकासकामांना तातडीने मंजुरी देऊन आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा, अशी जोरदार मागणी खासदार नीलेश लंके यांनी केंद्रीय अल्पसंख्याक कार्यमंत्री किरण रिजिजू यांच्याकडे निवेदनाद्वारे केली.

खासदार लंके यांनी सादर केलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, लोकसभा मतदारसंघातील अनेक अल्पसंख्याक बहुल वस्त्या आजही विकासाच्या मुख्य प्रवाहापासून काही प्रमाणात दूर आहेत. या भागांमध्ये शिक्षण, आरोग्य, स्वच्छता, पिण्याच्या

पाण्याची व्यवस्था, अंतर्गत रस्ते, अंगणवाडी, सामुदायिक सुविधा आणि रोजगाराभिमुख प्रशिक्षण केंद्रांचा अभाव असल्याने नागरिकांना दैनंदिन जीवनात अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. याचा थेट परिणाम विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर, युवकांच्या रोजगाराच्या संधींवर आणि महिलांच्या सामाजिक सक्षमीकरणावर होत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले आहे.

पीएमजेव्हीके ही केंद्र सरकारची महत्त्वाची योजना असून अल्पसंख्याक बहुल भागांमध्ये सामाजिक आणि आर्थिक विकासाला गती देण्यासाठी ही योजना प्रभावी माध्यम ठरू शकते. त्यामुळे या योजनेअंतर्गत मतदारसंघातील प्राधान्याच्या विकासकामांचा समावेश करून त्यांना तातडीने मंजुरी देण्यात यावी, अशी मागणी खासदार लंके यांनी केली आहे.

निवेदनामध्ये शाळांच्या नवीन इमारती, विद्यार्थ्यांसाठी सुसज्ज वसतिगृहे, प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रे, कौशल्य विकास केंद्रे, सामुदायिक भवन, अंगणवाडी केंद्रे, पिण्याच्या पाण्याच्या योजना, स्वच्छता सुविधा, अंतर्गत रस्त्यांचे बांधकाम, गटारे आणि इतर आवश्यक पायाभूत सुविधांसाठी विशेष निधी उपलब्ध करून देण्याची विनंती करण्यात आली आहे. या सुविधा उभारल्यास नागरिकांचे जीवनमान ▪ पान ४ वर

वैद्यकीय क्षेत्रात एम.आर.चे महत्वपूर्ण योगदान – डॉ. आशिष भंडारी

आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये मेडिकल रिप्रेझेन्टेटिव्ह दिन साजरा

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– जैन सोशल फेडरेशन संचालित आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे मेडिकल रिप्रेझेन्टेटिव्ह दिन साजरा करण्यात आला. नगर शहरासह जिल्ह्यात कार्यरत असलेले विविध औषध कंपन्यांचे मेडीकल रिप्रेझेन्टेटिव्ह, हॉस्पिटल मधील डॉक्टर, फार्मासिस्ट यात सहभागी झाले होते. कार्यक्रमात विविध औषधे, वैद्यकीय संशोधनाची माहिती डॉक्टरांपर्यंत पोहोचवण्याच्या कार्याबद्दल एम.आर. मंडळींचा गौरव करण्यात आला.

यावेळी महाराष्ट्र राज्य मेडिकल रिप्रेझेन्टेटिव्ह असोसिएशनचे सहसचिव सिद्धेश्वर कांबळे, जैन सोशल फाउंडेशनचे सदस्य तथा ट्रोईका फार्माचे बिझनेस मॅनेजर गणेश कांकरिया, हॉस्पिटलचे प्रशासनाधिकारी डॉ. आशिष भंडारी, प्रकाश मुनोत, पवन ठाणगे, महादेव बुरगुटे (टोरेंट फार्मा), मनोज पवार (मॅनकाईड), शशांक रोडे (सिप्ला), राहुल बोठे (थेमीस), औदुंबर शिंदे (लुपिन), अरूण दहिफळे, पियुष मंडलेचा, परेश मंडलेचा, आनंदऋषीजी फार्मसीच्या दिव्या कलमदाने आदींसह सुमारे १७५ एम.आर. उपस्थित होते.

डॉ. आशिष भंडारी म्हणाले, डॉक्टर आणि औषध निर्माण कंपन्या यांच्यातील महत्त्वाचा पूल म्हणून मेडिकल रिप्रेझेन्टेटिव्ह काम करतात. नवीन औषधे आणि वैद्यकीय संशोधनाची योग्य माहिती डॉक्टरांपर्यंत पोहोचवतात. ऊन, पाऊस किंवा व्यस्त कामाची पर्वा न करता ते अहोरात्र मेहनत करतात. वैद्यकीय क्षेत्रातील ते अतिशय महत्वाचा घटक आहे.

सिद्धेश्वर कांबळे म्हणाले, दरवर्षी एक ऑगस्ट रोजी मेडिकल रिप्रेझेन्टेटिव्ह दिन साजरा होतो. वैद्यकीय क्षेत्रात अतिशय महत्वपूर्ण काम करणाऱ्या एम.आर. साठी आनंदऋषीजी हॉस्पिटलने सन्मान कार्यक्रम घेऊन त्यांचा उचित सन्मान केला आहे. अशा कौतुकामुळे आणखी चांगले काम करण्याची प्रेरणा मिळते. एम.आर. क्षेत्रात करिअरच्या अनेक चांगल्या संधी उपलब्ध असून यासाठी काळानुरूप बदल अंगिकारले पाहिजेत.

या कार्यक्रमाने मेडिकल रिप्रेझेंटेटिव्ह भारावून गेले. आमच्या व्यावसायिक आयुष्यात प्रथमच मेडिकल रिप्रेझेंटेटिव्हसाठी एवढा आनंददायी आणि सन्मानाचा कार्यक्रम अनुभवायला मिळाला. हा सन्मान आम्ही सदैव लक्षात ठेवू. या कार्यक्रमाने आमच्या कार्याचा सन्मान झाला ही खूप प्रेरणादायी ▪ पान ४ वर

मुख्य रस्त्यास आद्य क्रांतिगुरू वीर लहुजी वस्ताद साळवे मार्ग; नामकरण फलकाचे अनावरण

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– विश्वविख्यात साहित्यरत्न लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या १०६ व्या जयंतीचे औचित्य साधून अहिल्यानगर शहरातील आद्य क्रांतिगुरू वीर लहुजी वस्ताद साळवे चौक ते सर्जेपुरा चौक या मुख्य रस्त्याचे अधिकृतपणे आद्य क्रांतिगुरू वीर लहुजी वस्ताद साळवे मार्ग असे नामकरण करण्यात आले. यानिमित्त आयोजित कार्यक्रमात नामकरण फलकाचे अनावरण करण्यात आले. या ऐतिहासिक निर्णयामुळे मातंग समाजासह बहुजन समाजामध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

महापालिकेच्या वतीने आयोजित या कार्यक्रमात शहराचे उपमहापौर धनंजय जाधव, नगरसेवक निखिल वारे, अंकल ढवण यांच्यासह विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते. सत्यशोधक बहुजन आघाडी, गौरवशाली मातंग इतिहास संवर्धन संघटना आणि मातंग एकता आंदोलन यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे या रस्त्याच्या नामकरणाचा निर्णय प्रत्यक्षात आला.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी आद्य क्रांतिगुरू वीर लहुजी वस्ताद साळवे यांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि क्रांतिकारी कार्याचा गौरव करताना त्यांच्या विचारांचे जतन करणे हीच खरी त्यांना अभिवादनाची भावना असल्याचे सांगितले. समाजातील वंचित, शोषित आणि दुर्बल घटकांना स्वाभिमानाने जगण्याची प्रेरणा देणारे लहुजी वस्ताद साळवे यांचे कार्य आजच्या पिढीने जाणून घेणे आवश्यक असल्याचेही वक्त्यांनी नमूद केले.

उपमहापौर धनंजय भैया जाधव म्हणाले, महापुरुषांच्या नावाने सार्वजनिक ठिकाणांचे नामकरण करणे म्हणजे त्यांच्या कार्याचा सन्मान करण्याबरोबरच पुढील पिढीपर्यंत त्यांचा प्रेरणादायी वारसा पोहोचविण्याचे काम आहे. वीर लहुजी वस्ताद साळवे यांचे सामाजिक योगदान अमूल्य असून, त्यांच्या नावाने या मुख्य रस्त्याचे नामकरण होणे हा संपूर्ण शहरासाठी अभिमानाचा क्षण आहे.

या कार्यक्रमाला समाजाचे ज्येष्ठ नेते चंद्रकांत काळोखे, सुनील ढोले, रामभाऊ वडागळे, गणेश शिरसाट, संजू साळवे, विनोद शिरसाट, उदय वडागळे, सागर खरे, युसुफ काते, नितीन घोरपडे यांच्यासह विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दै. आकर्षण निवडक

इंग्रजी वक्तृत्व स्पर्धेत आयकॉनच्या विद्यार्थिनींची चमकदार कामगिरी

अहिल्यानगर : शहरातील सेक्रेड हार्ट कॉन्व्हेंट हायस्कूलच्या वतीने आयोजित आंतरशालेय इंग्रजी वक्तृत्व स्पर्धेत द आयकॉन पब्लिक स्कूलच्या विद्यार्थिनींनी प्रभावी वक्तृत्व आणि आत्मविश्वासपूर्ण सादरीकरणातून आपला ठसा उमटविला. शाळेचे प्रतिनिधित्व करत आरना प्रसन्न कटारे आणि समायरा शाहिद काझी यांनी इंग्रजी भाषेवरील प्रभुत्व, स्पष्ट उच्चार, प्रभावी मांडणी आणि उत्तम रंगमंचीय उपस्थिती यांचे उत्कृष्ट दर्शन घडविले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा स्पर्धा महत्त्वपूर्ण ठरतात, याची पुन्हा एकदा प्रचिती आली. शरद मुथा एज्युकेशन ट्रस्टच्या अध्यक्षा मंगला मुथा, अध्यक्ष अशोक मुथा, विश्वस्त निर्मल मुथा, अमित मुथा, संचालक (प्रशासन) कर्नल आर. सी. राणा, संचालिका आराधना राणा तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका दीपिका नगरवाला यांनी सहभागी विद्यार्थिनींचे अभिनंदन करून भविष्यातही अशाच स्पर्धांमध्ये यश संपादन करण्यासाठी शुभेच्छा दिल्या.

नगर शहरात शरीराविरुध्दचे, मालाविरुध्दचे गुन्हे करणारी टोळी एक वर्षा करीता हद्दपार

अहिल्यानगर जिल्हयात कायदा व सुव्यवस्था आबादीत ठेवणे आवश्यक असल्याने गंभीर स्वरुपाचे शरीराविरुध्दचे व मालाविरुध्दचे गुन्हे करणाऱ्या सराईत गुन्हेगांरावर वचक बसविण्यासाठी आम्ही पोलीस अधीक्षक, अहिल्यानगर अहिल्यानगर शहरातील ०१ टोळी हद्दपार केले बाबतचे आदेश पारीत केलेला आहे.

नगर शहरातील कोतवाली पोलीस स्टेशन, तोफखाना पोलीस स्टेशन व भिंगार कॅम्प पोलीस स्टेशन हद्दत गैर कायदयाची मंडळी जमवुन घातक शस्त्रासह खुनाचा प्रयत्न करणे, अनुसुचित जाती जमातीच्या व्यक्तीला जाती वाचक शिवीगाळ करुन गंभीर दुखापत करणे, दरोडा टाकणे, अल्पवयीन मुलीस लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करणे, हद्दपार आदेशाचा भंग करणे, दोन समाजात तेढ निर्माण होवुन व्देष पसरेल असे वर्तन करणे, जबर दुखापत घडुन येईल याची जाणीव असतांना दडपशाहीने बलात्कार करणाऱ्या टोळी विरुध्द पोलीस निरीक्षक, कोतवाली पोलीस स्टेशन यांनी प्रस्ताव सादर केला होता. नमुद टोळीतील टोळी प्रमुख (१) सरवर अस्लम शेख उर्फ भिम्या,रा.झेंडीगेट, सुभेदार गल्ली, ता.जि.अहिल्यानगर.टोळी सदस्य (२)रेहान रऊफ शेख,वय २८ वर्षे,रा. नालसाब चौक, सुभेदार गल्ली,झेंडीगेट,ता.जि. अहिल्यानगर टोळी सदस्य (३) मुजम्मील शहीद शेख, वय २६ वर्षे, रा. घर नं.१८६६, जिलाणी बिल्डींग,ता.जि. अहिल्यानगर यांना ०१ वर्षाकरीता अहिल्यानगर जिल्हयातुन हद्दपार करण्यात आले.

वक्तृत्वाच्या व्यासपीठावर सेंट विवेकानंद स्कूलची यशस्वी भरारी

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– सेंट विवेकानंद इंग्लिश मीडियम स्कूलच्या विद्यार्थ्यांनी विविध वक्तृत्व स्पर्धांमध्ये उल्लेखनीय यश संपादन करत शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

कोपरगाव येथील शारदा इंग्लिश मीडियम स्कूल आयोजित राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत एकूण ३३शाळांचे ६६ विद्यार्थी सहभागी झाले होते.त्यातून शाळेच्या कु. पूर्वा संतोष पवार व कु. रिशिता किशोर ढवळे यांनी उत्तेजनार्थ पारितोषिकासह प्रत्येकी १,००० चे रोख बक्षीस मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले.यांना मराठी विभाग प्रमुख सीमा कोटस्थाने व इतर मराठी विषय शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. आतापर्यंत प्रत्येक स्पर्धेत शाळेने प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवून घवघवीत यश मिळवलेले आहे.

तसेच श्रीरामपूर येथे आयोजित जिल्हास्तरीय इंग्रजी वक्तृत्व स्पर्धेत कुमार अमोघ समीर पळसकर व कु. अपूर्वा सागेर नांदुरकर यांनी उत्तेजनार्थ पारितोषिकासह प्रत्येकी ५०० चे रोख बक्षीस प्राप्त केले.यांना इंग्लिश विभाग प्रमुख शिरीन शेख व इतर इंग्लिश विषय शिक्षक यांचे मार्गदर्शन लाभले. सतत २१ वर्ष सहभाग नोंदवत प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवत शाळेने दैदीप्यमान कामगिरी केलेली आहे,

या सर्व स्पर्धांसाठी शाळेच्या प्राचार्य गीता तांबे मॅडम विद्यार्थी व शिक्षक यांना सतत मोलाचे मार्गदर्शन देऊन प्रोत्साहन देत असतात.

याचबरोबर गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने सेंट विवेकानंद इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांनी गुरुजनांप्रती कृतज्ञता व्यक्त करणाऱ्या विशेष कार्यक्रमाचे सुंदर आयोजन केले. कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून शाळेच्या माजी शिक्षिका सौ.मीता कराचिवाला व माता पालक श्रीमती तेहरीन खान उपस्थित होत्या. गुरुपौर्णिमेचे औचित्य साधून त्यांचा शाळेच्या वतीने सन्मान करण्यात आला. विद्यार्थ्यांनी गीत, भाषणे, गुरुवंदना तसेच विविध सांस्कृतिक सादरीकरणांद्वारे उपस्थितांची मने जिंकली. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे व आयोजनाचे मनापासून कौतुक केले.

विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल तसेच गुरुपौर्णिमा कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल शाळेच्या प्राचार्या गीता तांबे, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. कंचन पापडेजा, शिक्षकवृंद, सहकारी कर्मचारी व पालकांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

या समारंभास संस्थेचे अध्यक्ष राम मेंघानी, उपाध्यक्ष रूपचंद मोटवानी, सचिव गोपाल भागवानी, खजिनदार दामोदर माखिजा तसेच विश्वस्त महेश मध्यान, सुरेश हिरानंदानी, राजकुमार गुरुनानी आणि हरेश मध्यान उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

अहिल्यानगर मनपा आरोग्य विभागातील

डॉ. आयेशा शेख व पाणी तपासणी कर्मचारी रमेश शेलार यांचा सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– अहिल्यानगर महानगरपालिका आरोग्य विभागातील डॉ. आयेशा शेख आणि पाणी तपासणी कर्मचारी रमेश शेलार यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त मनपा आरोग्य विभागाच्या वतीने त्यांचा सत्कार समारंभ उत्साहात पार पडला. यावेळी त्यांच्या प्रदीर्घ, प्रामाणिक आणि कर्तव्यनिष्ठ सेवेला मानाचा मुजरा करण्यात आला.

यावेळी बोलताना मनपा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजुरकर म्हणाले की, समाजामध्ये कोणत्याही क्षेत्रात काम करत असताना प्रामाणिकपणा, शिस्त आणि वेळेचे भान ठेवून केलेली सेवा समाजासाठी मोलाची ठरते. डॉ. आयेशा शेख यांनी गेल्या ३४ वर्षांपासून महापालिकेच्या आरोग्य विभागात अत्यंत निष्ठेने रुग्णसेवा करत आपल्या कर्तव्याचे उत्कृष्ट पालन केले. त्यांनी ज्या–ज्या आरोग्य केंद्रांमध्ये सेवा बजावली, तेथे ओपीडीतील रुग्णसंख्या वाढली. त्यांच्या कार्यशैलीमुळे नागरिकांचा आरोग्य यंत्रणेवर विश्वास अधिक दृढ झाला.

ते पुढे म्हणाले, सेवानिवृत्तीपर्यंत त्यांच्या सेवाकाळावर कोणताही ठपका किंवा कलंक लागला नाही, ही आजच्या डिजिटल आणि पारदर्शक युगातील अत्यंत कौतुकास्पद बाब आहे. आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांनी त्यांच्या कार्याचा आदर्श घेऊन नागरिकांना अधिक चांगली आरोग्य सेवा द्यावी.

डॉ. राजुरकर यांनी रमेश शेलार यांच्या कार्याचाही गौरव करत सांगितले की, शहरातील पिण्याच्या पाण्याचे नमुने तपासण्याचे

महत्त्वपूर्ण काम त्यांनी अनेक वर्षे जबाबदारीने पार पाडले. नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने सुरक्षित पाणीपुरवठा सुनिश्चित करण्यामध्ये त्यांचे योगदान उल्लेखनीय राहिले आहे.

या सत्कार समारंभास आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजुरकर, डॉ. दिलीप बागल, डॉ. वृषाली आरू, डॉ. नलिनी थोरात, योगेश औटी यांच्यासह आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.यावेळी आपल्या मनोगतात डॉ. आयेशा शेख म्हणाल्या की, महापालिकेच्या माध्यमातून गेल्या ३४ वर्षांमध्ये नगरकरांची आरोग्य सेवा करण्याची संधी मिळाली, हे माझे भाग्य आहे. शासनाच्या विविध आरोग्य योजना आणि मोहिमा यशस्वीपणे राबविण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले. शहरातील जवळपास सर्व आरोग्य केंद्रांमध्ये काम करण्याची संधी मिळाली. देशात प्रथमच पल्स पोलिओ लसीकरण मोहीम सुरू झाली तेव्हा प्रत्येक बालकापर्यंत लस पोहोचविण्याचे काम अत्यंत प्रामाणिकपणे केले. पदाधिकारी, अधिकारी आणि सहकारी कर्मचाऱ्यांचे नेहमीच सहकार्य लाभल्यामुळे चांगले काम करता आले.

जुन्या आरटीओ कार्यालयाला भीषण आग

जुनी कागदपत्रे आणि फर्निचर जळून खाक

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– संभाजीनगर रस्त्यावरील तारकपूर परिसरात असलेल्या जुन्या आरटीओ (उप प्रादेशिक परिवहन) कार्यालयाला रविवारी भीषण आग लागल्याची घटना घडली. परिसरातील नागरिकांच्या ही गोष्ट लक्षात येताच त्यांनी तात्काळ महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाशी संपर्क साधला.

या घटनेची माहिती महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाला समजतात त्यांनी घटनास्थळी धाव घेऊन आग विझवण्याचा प्रयत्न केला. काही

तास पाण्याचा मारा केल्यानंतर आग आटोक्यात आणण्यात अग्निशमन विभागाला यश आले.

या आगीमध्ये जुन्या आरटीओ कार्यालयात असलेली अनेक महत्त्वाची कागदपत्रे आणि जुने फर्निचर जळून त्याचा कोळसा झाला. अहिल्या नगर शहरातील चांदणी चौकात उभारण्यात आलेल्या नवीन प्रशस्त इमारतीमध्ये आरटीओ कार्यालयाचे स्थलांतर करण्यात आल्यामुळे जुन्या ऑफिसमध्ये असलेली कागदपत्रे जुन्या ऑफिसमध्येच ठेवण्यात आलेली होती. तसेच कार्यालयातील जुने फर्निचर ही याच ठिकाणी होते हे सर्व आगीच्या घटनेत जळून खाक झाले. आगीने रौद्ररूप धारण केल्यामुळे परिसरामध्ये काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र अग्निशामक विभागाच्या तत्परतेमुळे आग आटोक्यात आली.

फॅसिझमचा पराभव संविधानिक विचारानेच होईल- डॉ. भालचंद्र कांगो

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– भारतात पसरलेला धर्माधिष्ठित फॅसिझमचा पराभव करायचा असेल तर संविधानाशिवाय पर्याय नाही, त्यासाठी लेखकांनी सामाजिक भान ठेवून जबाबदारीने लेखन करणे आवश्यक आहे. सर्व कम्युनिस्ट चळवळी बरोबरच लोकशाहीवादी लोकांना एकत्र आल्याशिवाय धर्मांध शक्तींचा पराभव करता येणार नाही. लेखकांनी प्रगतिशील असले पाहिजे असे प्रतिपादन भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे राष्ट्रीय सचिव डॉ. भालचंद्र कांगो यांनी केले.

प्रगतिशील लेखक संघाच्या वतीने अहिल्यानगर येथील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयात आयोजित सहाव्या राज्य अधिवेशनाच्या समारोप समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून कांगो बोलत होते.

पुढे कांगो म्हणाले की, आताच्या काळात जे अशक्य वाटत होते ते तरुणाईने दिल्लीमध्ये शक्य करून दाखवले आहे. जेन जीच्या नव्या पिढीतील मुले–मुली धर्मांध शक्तींच्या विरोधात उभे आहेत. सोशल मीडियावर ते सत्ताधाऱ्यांना प्रश्न विचारत आहेत. हीच

नव्या क्रांतीची सुरुवात आहे. नव्या पिढीने सोशल मीडियाचा वापर करून मुख्य प्रवाहातील माध्यमांची मक्तेदारी संपवली आहे. प्रगतिशील लेखक संघाने आता या तरुणांना एकत्र घेऊन काम केले पाहिजे असेही ते म्हणाले.

यावेळी राज्य कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली. अध्यक्षपदी प्रसिद्ध लेखक जी. के. ऐनापुरे तर महासचिवपदी प्रसिद्ध कादंबरीकार राकेश वानखेडे यांची फेरनिवड करण्यात आली. समारोप प्रसंगी ॲड. कॉ. बन्सी सातपुते, दिवाकर कृष्णा आचार्य कॉ. नीलिमा बंडेलु, साहित्यिक डी.जी वाघ, जी.के. ऐनापुरे यांनीही मनोगते व्यक्त केले. राकेश वानखेडे यांनी प्रास्ताविक केले. तर डॉ. बापू चंदनशिवे यांनी सूत्रसंचालन केले.

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांना अभिवादन; मनपा सहकारी पतसंस्थेकडून पुष्पहार अर्पण

लेखणी, शाहिरी आणि लोककलेच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तन घडविणारे अण्णाभाऊ साठे समाजाला प्रेरणादायी – मुदगल

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– महानगरपालिका सहकारी पतसंस्थेच्या वतीने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी त्यांच्या सामाजिक, साहित्यिक व लोकशाहीर म्हणून केलेल्या कार्याचा गौरव करण्यात आला.

यावेळी बोलताना पतसंस्थेचे चेअरमन बाबासाहेब मुदगल म्हणाले की, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे हे केवळ साहित्यिक नव्हते, तर त्यांनी आपल्या प्रभावी लेखणी आणि शाहिरीच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तनाची व्यापक चळवळ उभी केली. समाजातील वंचित, श्रमिक, कष्टकरी आणि अन्यायग्रस्त घटकांचा आवाज त्यांनी आपल्या साहित्याद्वारे बुलंद केला. त्यामुळेच त्यांना 'लोकशाहीर' हा मानाचा किताब मिळाला.

ते पुढे म्हणाले की, अण्णाभाऊ साठे यांचे जीवन संघर्षमय होते. कामगार चळवळीशी एकरूप होत त्यांनी समाजातील विषमता, अन्याय आणि शोषणाविरुद्ध सातत्याने आवाज उठविला. पोवाडे, लावण्या, कथा, कादंबऱ्या, नाटके आणि लोकनाट्य अशा विविध साहित्यप्रकारांतून त्यांनी सामाजिक वास्तव मांडले. त्यांच्या साहित्यामध्ये समता, सामाजिक न्याय, श्रमिकांचे जीवन, मानवी मूल्ये आणि अन्यायाविरोधातील संघर्ष यांना विशेष स्थान आहे. त्यांच्या विचारांतून आजच्या युवकांना प्रेरणा, सामाजिक भान आणि परिवर्तनाची ऊर्जा मिळते. प्रत्येकाने त्यांच्या विचारांचे आचरण करून समाजहितासाठी कार्य करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

यावेळी पतसंस्थेचे व्हाईस चेअरमन कैलास चावरे यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या कार्याचा गौरव करताना सांगितले की, त्यांनी महाराष्ट्राच्या एकीकरणाच्या लढ्यात तसेच कामगारांच्या प्रश्नांसाठी आपल्या शाहिरीच्या माध्यमातून प्रभावी जनजागृती केली. सामाजिक परिवर्तनासाठी लोककलेचा प्रभावी वापर करणारे ते असामान्य व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्या कार्याचा आदर्श समाजाने कायम स्मरणात ठेवला पाहिजे, असे ते म्हणाले.

या अभिवादन कार्यक्रमास व्हाईस चेअरमन कैलास चावरे, तज्ज्ञ संचालक जितेंद्र सारसर, ज्येष्ठ संचालक सतीश ताठे, विकास गीते, शेखर देशपांडे, बलराज गायकवाड, अजय कांबळे, बाळासाहेब पवार, विजय कोतकर, सोमनाथ सोनवणे, गुलाब गाडे, किशोर कानडे, बाळासाहेब गंगेकर, संचालिका प्रमिलाताई पवार, कार्यलक्षी संचालक आनंद तिवारी सागर साठे यांच्यासह पदाधिकारी, संचालक व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शब्दकोडे क्रमांक : २१



आडवे शब्द : १. पूर्व दिशा २. शिक्षण घेतलेला ४. ध्वज ५. दीप ७. तत्त्व ८. एक मिष्टान्न ९. माता सीतेचे पिता ११. खूप आत १३. डोंगराचा सरळ उतार १४. पगार १५. धातूची धारदार चकती १६. परमेश्वराने घेतलेले रूप १८. वनस्पतीचा कढवलेला औषधी रस २०. रोगप्रतिकारक टोचतात ते इंजेक्शन २१. इंग्रजीत-चहा २३. लवण २४. तेजी २७. ताक घुसळण्याचे साधन २८. एक शस्त्र २९. गोरी-विरुद्ध ३०. धरती ३२. पाणी ३३. सिंहाचे पिल्लू ३४. हिंदीत-कमी ३५. वर्ष ३६. भेद ३७. नाश पावणे ३८. लहान काटकी ३९. एक चतुर्थांश हिस्सा ४०. रांगोळी रंगबेरंगी करण्यासाठी भरतात ते ४१. उदर ४२. ढीग ४३. मळका ४५. भेग ४७. रोमांच ५०. वेग ५१. सप्तसुरांची धून ५२. सप्त

उभे शब्द : १. जीव २. मोदकात भरतात ते ३. पल ४. एक फूल ५. सूर्य ६. सरळ रेषेत नसलेला ८. तांबडा १०. सवत-हिंदीत ११. गावचा सारा गोळा करणारा १२. सूट १५. अंकांची उजळणी १७. साठ मिनिटांचा काळ १८. व्यवहार १९. व्यवहारातील कौशल्य २२. दर्पण २५. कलिका २६. शाश्वती ३०. तग ३१. घसा ३२. एक रानगायीचा प्रकार ३३. मोहोर ३४. मेहनत ३५. छाया ३६. सोबत ३७. तमाश्यातील नाच्या पात्रावर आधारित एक मराठी सिनेमा ३८. आरसा बनवण्यासाठी वापरतात तो मुख्य घटक ३९. रमपा-उलट लिहा ४२. खाद ४४. वस्तू मोजण्याचे एकक ४६. मच्छर ४८. हिंदीत-दुःख ४९. दर्जा

शब्दकोडे क्रमांक : २० चे उत्तर

वे	ग	वा	न	■	व	■	बा	जा	र	■	अ
स	ज	■	का	र	खा	ना	■	स्वं	■	का	र
ण	■	हा	र	■	र	■	आ	दी	मा	न	व
■	म	नी	■	ना	■	सा	ठ	■	व	■	ली
चा	र	■	ह	ल	च	ल	■	वा	स	रू	■
क	ण	ख	र	■	व	■	सो	य	■	ढ	ग
■	या	री	■	सु	दा	न	■	दा	वा	■	म
ज्ञा	त	■	दु	पा	र	■	वि	■	रा	न	■
■	ना	न	■	री	■	प्र	का	र	■	क	ल
स	■	व	ली	■	लं	ग	र	■	ख	टा	व
पा	ग	ल	■	सा	■	त	■	मे	ळ	■	क
न	त	■	वि	रा	ट	■	सा	थी	■	शी	र

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस– प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई–मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

दै. आकर्षण निवडक

'स्नेहबंध'चा वृक्षसंवर्धनातून पर्यावरण संरक्षणाचा निर्धार

अहिल्यानगर - पर्यावरणाच्या संवर्धनाची आजची तातडीची गरज लक्षात घेऊन, स्नेहबंध सोशल फौंडेशनच्या वतीने अहिल्यानगर वन विभागाच्या परिसरात नुकताच उत्साहात वृक्षारोपण कार्यक्रम पार पडला. उपवनसंरक्षक धर्मवीर सालविठ्ठल यांच्या हस्ते या उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. या वृक्षारोपण कार्यक्रमास वनपरिक्षेत्र अधिकारी अविनाश तेलोरे, सेवानिवृत्त प्राचार्य एकनाथ जगताप, स्वयंम बास्कर यांच्यासह वन विभागाचे इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. उपवनसंरक्षक धर्मवीर सालविठ्ठल म्हणाले, वृक्षारोपण करणे ही केवळ एक सामाजिक जबाबदारी नसून, भविष्यातील पिढ्यांसाठी निरोगी आणि सुरक्षित पर्यावरण निर्माण करण्याची ही गरज आहे. आपण सर्वजण मिळून लावलेल्या प्रत्येक झाडाचे संगोपन करण्याची जबाबदारी स्वीकारली पाहिजे.वृक्षसंवर्धनावर आमचा विशेष भर: डॉ. उद्धव शिंदेपर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी वृक्षसंवर्धन अत्यंत आवश्यक आहे. केवळ वृक्षारोपण करून थांबणे नाही, तर रोपांचे संगोपन आणि संवर्धन करण्यावर स्नेहबंध सोशल फौंडेशनचा कायम भर राहणार आहे. समाजातील प्रत्येक घटकाने अशा पर्यावरण संवर्धनाच्या उपक्रमांमध्ये हिरीरीने सहभागी व्हावे, असे आवाहन स्नेहबंध सोशल फौंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांनी केले.

एमआयडीसीमध्ये साहित्यरत्न लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांची १०६ वी जयंती उत्साहात साजरी

अहिल्यानगर - साहित्यरत्न लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त सह्याद्री चौक, एमआयडीसी येथे सत्यशोधक लोकशाहीर अण्णाभाऊ साठे बहुउद्देशीय सेवा फाउंडेशन आणि कामगार संघटना, एमआयडीसी यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य जयंती सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. अबीर-गुलालाची उधळण, राष्ट्रभक्तीपर घोषणांचा जयघोष आणि उत्साहपूर्ण वातावरणात हा कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाच्या प्रारंभी एमआयडीसी पोलीस ठाण्याचे एपीआय थोरात यांनी लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. त्यानंतर महाप्रसाद वाटपाचा शुभारंभ करण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन उद्योजक बाळासाहेब मोरे यांनी केले. महाप्रसादाची व्यवस्था अनिलशेठ नागरगोजे यांनी केली असून सुनीलशेठ मुनोत यांचे विशेष सहकार्य लाभले.यावेळी अहिल्यानगर महानगरपालिकेचे नगरसेवक बाबासाहेब नागरगोजे, केशवशेठ नागरगोजे, मेजर निळकंठ उल्हारे, अनिलशेठ भिंगारे, सरपंच बबन डोंगरे, ग्रामपंचायत सदस्य बंडूनाना सप्रे, संजय भोर, खंडारे दाजी, नाथाभाऊ आल्हाट, जयश्री गायकवाड, ज्योती साठे, कल्याणी गोरखे, रमेश भिंगारदिवे, पोपट वैरागर, बाबू भाकरे, वाल्हेकर मामा तसेच कामगार संघटनेचे पदाधिकारी, प्रतिनिधी आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम उत्साहपूर्ण आणि सामाजिक सलोख्याच्या वातावरणात पार पडला.

फिनिक्सच्या नेत्र तपासणी शिबिरातून गरजूंवर मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया

अहिल्यानगर- सामाजिक बांधिलकी जपत आरोग्यसेवेच्या क्षेत्रात सातत्याने कार्यरत असलेल्या फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या वतीने नगर तालुक्यातील नागरदेवळे येथे आयोजित करण्यात आलेल्या मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराला ज्येष्ठ नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या उपक्रमातून तपासणी झालेल्या रुग्णांपैकी २२ ज्येष्ठ नागरिकांवर मोफत मोतीबिंदू व काचबिंदूच्या शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पडल्या. तसेच शिबिरात रक्तदाब, मधुमेह आणि इतर आरोग्य तपासण्यांचीही मोफत सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. नागरदेवळे येथील संत सावता महाराज मंदिर परिसरात पार पडलेल्या या शिबिराचे उद्घाटन नगरसेवक तथा केमिस्ट असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष दत्ता गाडळकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी त्यांनी फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या सामाजिक कार्याचे कौतुक करत, संस्था गेल्या अनेक वर्षांपासून आरोग्य क्षेत्रात निस्वार्थ भावनेने उल्लेखनीय सेवा देत असल्याचे सांगितले. दत्ता गाडळकर म्हणाले की, अशा उपक्रमांमुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल व गरजू ज्येष्ठ नागरिकांना मोठा दिलासा मिळत आहे. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत आरोग्यसेवा पोहोचविण्याचे कार्य ही संस्था सातत्याने करत असून, या सामाजिक उपक्रमात केमिस्ट असोसिएशनचेही पूर्ण सहकार्य राहील, अशी ग्वाही त्यांनी दिली. यावेळी ह.भ.प. देवीदास महाराज बारस्कर यांनी फिनिक्सच्या उपक्रमाचे कौतुक केले.

टाकळी ढोकेश्वर येथे खड्ड्यात झाड लावून गांधीगिरी

गावांतर्गत मुख्य रस्ते बनले धोकादायक । ग्रामस्थांची आक्रमक भूमिका । टाकळी ढोकेश्वर बाजारपेठेचे अस्तित्व धोक्यात असल्याची चिंता

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– टाकळी ढोकेश्वर हे परिसरातील गावांसाठी महत्त्वाचे बाजारपेठेचे केंद्र असून गावात येणाऱ्या प्रमुख रस्त्यांची अत्यंत दुरवस्था झाली आहे. रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडल्याने अपघातांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच ग्रामपंचायत प्रशासनाकडून या गंभीर समस्येकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप करत ग्रामस्थांनी पाण्यात उतरून अनोखे आंदोलन केले. खड्ड्यात उभे राहून झाड लावत गांधीगिरी केली.

या आंदोलनादरम्यान शिवसेनेचे युवा नेते लहू जाधव,उपसरपंच रामभाऊ तराळ, युवा नेते विक्रम झावरे, शिवसेना नेते अंकुश पायमोडे, माळीभाऊ रांधवण, किसन धुमाळ, युसुफ हवालदार, सुभाष महाराज जाधव, भाऊसाहेब झावरे, शिराज हवालदार, नामदेव ठुबे, सनी घाडगे, अभिजित (बंटी) जाधव, निहाल हवालदार के. बी. बांडे यांच्यासह अनेक ग्रामस्थ सहभागी झाले होते.

रस्त्यावरील खड्ड्यांचा निषेध नोंदवण्यासाठी आंदोलनकर्त्यांनी खड्ड्यामध्ये वृक्षारोपण केले. यावेळी सामाजिक कार्यकर्ते विक्रम झावरे पाटील यांनी संबंधित ठेकेदाराच्या कामाची चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी केली. कारवाई न झाल्यास ग्रामपंचायत व विरोधात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही त्यांनी दिला. दरम्यान, गावातील अनेक महत्त्वाच्या रस्त्यांवर अतिक्रमण झाल्यामुळे वाहतूक कोंडीची समस्या वाढली आहे. खड्डे आणि अतिक्रमण यामुळे एस.टी. बससेवाही गावाबाहेरून वळवली जात असल्याने स्थानिक बाजारपेठेवर विपरीत परिणाम होत आहे. त्यामुळे प्रशासनाने तातडीने खड्डे बुजवून अतिक्रमण हटवावे, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

टाकळी ढोकेश्वर बाजारपेठेचे अस्तित्व धोक्यात

टाकळी ढोकेश्वरच्या गावातील प्रमुख रस्त्यांची अवस्था अत्यंत बिकट झाली आहे. टाकळी ढोकेश्वर ही परिसरातील मोठे बाजारपेठ असून या बाजारपेठेचे अस्तित्व त्यामुळे धोक्यात आले आहे. त्यामुळे दररोज लहान-मोठे अपघात होत असून नागरिकांचा जीव धोक्यात आला आहे. प्रशासनाने वारंवार मागणी करूनही दखल घेतलेली नाही.

लहू जाधव (शिवसेना नेते, टाकळी ढोकेश्वर)

ठेकेदाराच्या कामाची सखोल चौकशी करा

टाकळी ढोकेश्वरच्या प्रमुख रस्त्यांवरील खड्डे हे प्रशासनाच्या निष्काळजीपणाचे प्रतीक आहेत. या रस्त्यांमुळे रोज अपघात होत असून नागरिकांचे जीव धोक्यात आले आहेत. संबंधित ठेकेदाराच्या कामाची सखोल चौकशी करून दोषींवर तातडीने कारवाई करावी. अन्यथा ग्रामपंचायत व विरोधात ग्रामस्थांच्या सहभागाने तीव्र जनआंदोलन उभारण्यात येईल.

विक्रम झावरे (टाकळी ढोकेश्वर)

आंतरशालेय फुटबॉल स्पर्धेत ऑर्किड शाळेचा साहिल मुन्शी चमकला

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– फिरोदिया शिवाजीयन्स ॲकेडमी आयोजित आंतरशालेय फुटबॉल स्पर्धेत ऑर्किड हायस्कूल आणि तक्षशिला शाळेत अत्यंत चुरशी चा सामना झाला. सदर सामन्यात दोन्ही शाळेतील विद्यार्थ्यांनी फुटबॉल खेळाचे अत्यंत उत्कृष्ट प्रदर्शन केले. या मध्ये ऑर्किड शाळेचा विद्यार्थी साहिल मुन्शी हा डिफेन्समध्ये चमकला. त्याने तक्षशिला या शाळेचे गोलकरीता होणारे हल्ले परतऊन लावले. परंतु शेवटी तक्षशिला शाळेने दोन विरुद्ध शुन्य या गोलने आर्किड शाळेचा पराभव केला.

या आंतरशालेय फुटबॉल स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांमध्ये खिलाडू वृत्ती निर्माण होऊन प्रेक्षकांना सूद्धा खेळाचा आनंद घेता आला. या स्पर्धेच्या आयोजकांनी अत्यंत उत्कृष्ट असे नियोजन केले होते.

पत्रकार प्रशांत वाव्हळ यांचे दुःखद निधन

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– अहिल्यानगर शहरातील विविध वृत्तपत्रांमध्ये उपसंपादक या पदावर काम केलेले पत्रकार प्रशांत वाव्हळ यांचे दुःखद निधन झाले. त्यांच्या अकाली जाण्याने पत्रकारिता क्षेत्रातील एक अनुभवी, अभ्यासू आणि समर्पित सहकारी हरपला आहे. पत्रकारितेतील आपल्या प्रदीर्घ कारकिर्दीत त्यांनी दैनिक नगर टाईम्स, दैनिक सार्वमत, दैनिक प्रभात, दैनिक पुढारी आणि दैनिक अजिंक्य भारत या वृत्तपत्रांमध्ये उपसंपादक म्हणून जबाबदारीने कार्य केले.

वृत्तपत्र क्षेत्रातील त्यांचे योगदान आणि सहकाऱ्यांशी असलेले जिव्हाळ्याचे नाते सदैव स्मरणात राहील. त्यांच्या पश्चात वडील, पत्नी आणि मुलगा असा परिवार आहे.

पाठपुराव्याला यश; पंचायत समिती पैठणमधील शिक्षकाची स्वीय सहाय्यक नियुक्ती रद्द

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

पैठण – छावा क्रांतिवीर सेनेच्या पाठपुराव्यानंतर पंचायत समिती पैठण येथे सभापतींचे स्वीय सहाय्यक म्हणून कार्यरत असलेल्या पदवीधर प्राथमिक शिक्षक जनार्दन बाजीराव दराडे यांची नियुक्ती रद्द करण्यात आली आहे. त्यांना मूळ पदस्थापनेच्या शाळेत तात्काळ हजर होण्याचे आदेश पंचायत समिती प्रशासनाने दिले आहेत.

छावा क्रांतिवीर सेनेचे प्रदेश सरचिटणीस अनिल गोपाळराव राऊत यांनी २९ मे २०२६ रोजी या नियुक्तीविरोधात लेखी निवेदन दिले होते. तसेच माहिती अधिकारातून प्राप्त कागदपत्रांच्या आधारे नियुक्ती नियमबाह्य असल्याचा दावा करण्यात आला होता. त्यानंतर पंचायत समितीने ३ ऑगस्ट २०२६ रोजी आदेश काढून संबंधित शिक्षकांची स्वीय सहाय्यक पदावरील नियुक्ती रद्द केली.

याबाबत अनिल राऊत म्हणाले, ''हा कोणत्याही व्यक्तीचा पराभव नसून विद्यार्थ्यांच्या शिक्षण हक्काचा आणि कायद्याचा विजय आहे. शिक्षक हा विद्यार्थ्यांसाठी असतो, राजकीय कार्यालयासाठी नाही. नियमबाह्य बाबींविरोधात छावा क्रांतिवीर सेना यापुढेही ठामपणे लढत राहील.''

दरम्यान, छावा क्रांतिवीर सेनेने नियमबाह्य नियुक्तीला मंजुरी देणाऱ्या अधिकाऱ्यांची विभागीय चौकशी करावी, दोषींवर नियमानुसार कारवाई करावी आणि भविष्यात शिक्षकांची राजकीय कार्यालयात नियमबाह्य नियुक्ती होणार नाही, याची खात्री करण्याची मागणी प्रशासनाकडे केली आहे. तसेच या लढ्यात सहकार्य करणाऱ्या नागरिक, पालक, पत्रकार आणि कार्यकर्त्यांचे आभार मानत ''शिक्षक वर्गात हवा, राजकीय कार्यालयात नाही'' हा लढा पुढेही सुरू राहणार असल्याचे संघटनेने स्पष्ट केले आहे.

शिष्यवृत्ती परीक्षेत काकासाहेब म्हस्के विद्यालयाची उज्ज्वल कामगिरी

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– जनता शिक्षण प्रसारक मंडळ संचलित काकासाहेब म्हस्के विद्यालयातील विद्यार्थ्यांनी राज्यस्तरीय मंथन परीक्षा व पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करून विद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेची परंपरा कायम राखली आहे. शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांचा विद्यालयाच्या वतीने गुलाबपुष्प देऊन कौतुक व गुणगौरव करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे विद्यालयाच्या शैक्षणिक क्षेत्रातील लौकिकात आणखी भर पडली असून शिक्षक, पालक व विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

मंथन परीक्षेत राज्यस्तरावर दहावा क्रमांक एकता भरत पवार,धनश्री सचिन जाधव, पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेत हर्षवर्धन जाधव ,शिवम बडे ,ईश्वरी कोतकर, यांचे नेत्रदीपक यश मिळवले. स्पर्धात्मक वातावरणात झालेल्या या परीक्षेत विद्यार्थ्यांनी घेतलेली मेहनत, सातत्यपूर्ण अभ्यास, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचे प्रोत्साहन यामुळे त्यांना हे यश मिळाले. विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

शिष्यवृत्ती परीक्षा ही विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमतेला, अभ्यासातील सातत्याला आणि स्पर्धात्मक परीक्षांच्या तयारीला चालना देणारी महत्त्वपूर्ण परीक्षा मानली जाते. या परीक्षेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये लहान वयापासूनच स्पर्धात्मक दृष्टिकोन, आत्मविश्वास, वेळेचे नियोजन आणि अभ्यासाची शिस्त निर्माण होते. काकासाहेब म्हस्के विद्यालयातील विद्यार्थ्यांनी या परीक्षेत मिळविलेले यश हे विद्यालयात राबविण्यात येणाऱ्या गुणवत्तापूर्ण शैक्षणिक उपक्रमांचे फलित असल्याचे यावेळी शिक्षकांनी सांगितले.

यशस्वी विद्यार्थ्यांना विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ. सुनंदा धामणे, तसेच श्रीमती सविता दहातोंडे ,श्रीमती. अंजली औटी, श्रीमती सुचिता पठारे,श्रीमती अर्चना गाडेकर,श्रीमती विजया साबळे,श्री. सुमेध मेढे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यामुळे विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती परीक्षेच्या तयारीसाठी भक्कम आधार मिळाला. विद्यालयाच्या गुणवंत विद्यार्थ्यांचे यश हे केवळ विद्यार्थ्यांचे नसून त्यामागे शिक्षकांचे मार्गदर्शन, पालकांचे सहकार्य आणि संस्थेने निर्माण केलेले शैक्षणिक वातावरण यांचा मोठा वाटा आहे. विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या या यशाबद्दल जनता शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष तथा मा. आमदार श्री. नरेंद्रजी घुले पाटील, संस्थेचे सचिव तथा मा. आमदार श्री. चंद्रशेखर घुले पाटील, अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौ. राजश्रीताई घुले पाटील, शेवगाव पंचायत समितीचे सभापती डॉ. क्षितिज भैया घुले पाटील, प्रशासकीय अधिकारी श्री. कारभारी नजन, संस्था समन्वयक श्री. विजय काशीद, प्राचार्या सौ. शितल बांगर, मुख्याध्यापिका सौ. सुनंदा धामणे आदींनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

ऑपरेशन ऑल आऊटची धडक कारवाई; एमआयडीसी पैठण पोलिसांनी एका दिवसात ७ गुन्हे दाखल

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

पैठण – गुन्हेगारी व अवैध धंद्यांवर आळा घालण्यासाठी एमआयडीसी पैठण पोलिसांनी राबविलेल्या ऑपरेशन ऑल आऊट मोहिमेत धडक कारवाई करत एका दिवसात ७ गुन्हे दाखल केले. या कारवाईत अवैध दारू जप्त करण्यासह तंबाखूजन्य पदार्थांवरही कारवाई करण्यात आली.

दि. ३ ऑगस्ट रोजी झालेल्या विशेष मोहिमेत कायद्यान्वये ३ गुन्हे दाखल करून शाळांच्या परिसरातील पानटपऱ्यांवर छापे टाकण्यात आले. यावेळी ७२० रुपयांचा तंबाखूजन्य मुद्देमाल जप्त करण्यात आला.

तसेच महाराष्ट्र दारुबंदी कायद्यान्वये ३ गुन्हे दाखल करून ३४ बाटल्या देशी दारू (किंमत ३,८८० रुपये) जप्त करण्यात आली. सार्वजनिक ठिकाणी मद्यप्राशन करून गोंधळ घालणाऱ्या एका इसमाविरुद्धही दारुबंदी कायद्याच्या कलम ८५(१) अन्वये कारवाई करण्यात आली.

याशिवाय पाच हॉटेलांची तपासणी, शाळा व महाविद्यालय परिसरात टवाळखोरांविरोधात मुंबई पोलीस अधिनियम कलम ११० व ११७ अन्वये चार कारवाया, तसेच प्रवासी वाहनांची तपासणी करून १ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.

एमआयडीसी पैठण पोलिसांची ही कारवाई अवैध धंदे, टवाळखोर व कायदा मोडणाऱ्यांविरोधातील मोहीम अधिक तीव्र होत असल्याचे दर्शवत आहे.

बायरकडून बागायतदार शेतकऱ्यांना पिकांच्या विनाशकारी रोगांशी लढण्यास मदत करण्यासाठी झिवाना स्मार्ट हे पुढच्या पिढीतील बुरशीनाशक सादर

झिवाना स्मार्टडाऊनी मिल्ड्यू आणि लेट ब्लाइटवर उत्कृष्ट नियंत्रण देते 'प्रतिरोधकता (रेझिस्टन्स) विकसित होण्याचा धोका कमी करण्यासाठी विकसित केलेले.'द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांसाठी बायरची मजबूत उत्पादनश्रेणी अधिक बळकट करते

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– बायरने झिवाना स्मार्ट या आपल्या नवीनतम बुरशीनाशक उत्पादनाच्या प्रारंभाची घोषणा केली. हे उत्पादन केवडा डाऊनी मिल्ड्यू आणि लेट ब्लाइट अशा विनाशकारी रोगांपासून उच्च-मूल्याच्या फळबाग पिकांचे संरक्षण करण्यासाठी तयार करण्यात आले आहे. एफआरएसी गट ४९ अंतर्गत असलेल्या नवीन सक्रिय घटकाच्या साहाय्याने झिवाना स्मार्ट द्राक्षे, काकडीवर्गीय पिके, बटाटा आणि टोमॅटोमध्ये उत्कृष्ट रोग नियंत्रण प्रदान करते. त्यामुळे शेतकऱ्यांना पिकाची गुणवत्ता जपण्यास, उत्पादकता सुधारण्यास आणि परतावा वाढविण्यात मदत होते.

डाऊनी मिल्ड्यू आणि आणि लेट ब्लाइट हे फळबाग पिकांवर परिणाम करणाऱ्या सर्वात

विनाशकारी रोगांपैकी आहेत आणि अनेकदा शेतकऱ्यांच्या पीक संरक्षण खर्चापैकी जवळपास निम्मा खर्च याच रोगांवर होतो. बदलत्या हवामानामुळे आणि दीर्घकाळच्या आर्द्रतेमुळे रोगांचा प्रादुर्भाव वाढत असल्याने शेतकऱ्यांना अशा नाविन्यपूर्ण उपायांची आवश्यकता आहे जे शाश्वत शेती पद्धतींना पाठिंबा देताना विश्वसनीय आणि दीर्घकाळ टिकणारे संरक्षण प्रदान करतील.

झिवाना स्मार्ट आपल्या आधुनिक कार्यपद्धतीने या आव्हानाला सामोरे जाते जी ऊमायसीट रोगांविरुद्ध सर्वोत्तम कामगिरी करते. हे द्रावण पावसाळी परिस्थितीतही सरासरी ७ ते १४ दिवस टिकणाऱ्या संरक्षणासह उत्कृष्ट परिणामकारकता प्रदान करते. पावसाचा परिणाम न होण्याचा त्याचा गुणधर्म आणि आधीच अस्तित्वात असलेली पाने व नवीन वनस्पतींची वाढ या दोन्हींचे संरक्षण करण्याची क्षमता, शेतकऱ्यांना संपूर्ण पीक चक्रात रोगांचा प्रादुर्भाव अधिक चांगल्या प्रकारे व्यवस्थापित करण्यास सक्षम करते.

या उत्पादनाच्या शुभारंभाबाबत बोलताना बायरच्या पीक विज्ञान विभागाचे भारतातील मुख्य कार्यकारी अधिकारी मोहन बाबू म्हणाले: ''भारताच्या पोषण सुरक्षेसाठी आणि शेतकऱ्यांच्या समृद्धीसाठी फलोत्पादन हे केंद्रस्थानी आहे. झिवाना स्मार्टच्या माध्यमातून बायर एक विज्ञानकेंद्री नवसंशोधन आणत आहे. ते फलोत्पादक शेतकऱ्यांना रोगांच्या गुंतागुंतीच्या समस्यांचे व्यवस्थापन करण्यास, पिकांची गुणवत्ता जपण्यास आणि अधिक लवचिक व शाश्वत अन्नप्रणाली तयार करण्यास मदत करते.''

झिवाना स्मार्ट हे महाराष्ट्र, कर्नाटक, तामिळनाडू, उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल, छत्तीसगड, मध्य प्रदेश, गुजरात, राजस्थान, आसाम, आंध्र प्रदेश आणि पंजाब यांसारख्या प्रमुख फलोत्पादन करणाऱ्या प्रदेशांमध्ये उपलब्ध होईल. झिवाना स्मार्ट हे उत्पादन शेतकऱ्यांना लवचिकता, उत्पादकता आणि शाश्वत कृषी परिणामांसाठी उपयुक्त नावीन्यपूर्ण पीक संरक्षण उपायांसह सक्षम करण्याच्या बायरच्या वचनबद्धतेला अधिक दृढ करते.

अंबिका महिला सह.बँकेच्या संचालकपदी मरकड, वाघ, अनभुले, मांढरे यांची निवड

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– देशात महिला बँक चळवळीमध्ये अग्रेसर असलेल्या अंबिका महिला सहकारी बँकेच्या चार रिक्त झालेल्या जागेवर नवीन संचालकांची निवड करण्यात आली. निवडणूक अधिकारी म्हणून सहाय्यक उपनिबंधक बाळकृष्ण शिंदे यांनी काम पाहिले.

रिक्त झालेल्या या चार पदावरती नवीन संचालिका भरण्यासाठी संचालक मंडळाची विशेष सभा शनिवारी बोलवण्यात आली होती यावेळी सौ.वैशाली किशोर मरकड,सौ. शिल्पा अभिजीत वाघ, सौ. डॉ. सौ.दिपाली भूषण अनभुले, सौ.आरती सुनील मांढरे साबळे यांची नियुक्ती करण्यात आली.

बँकेच्या विद्यमान संचालिका प्रा. पुष्पाताई मरकड ,प्रा. पुष्पलता वाघ ,सविता गांगर्डे यांच्या निधनानंतर तसेच प्रकृतीच्या कारणाने डॉ. क्रांतीकला अनभुले यांनी दिलेल्या राजीनामामुळे या जागा रिक्त झाल्या होत्या. त्या रिक्त जागी नवीन संचालिकांना घेण्यात आले. यावेळी सौ वैशाली मरकड यांच्या नावाची सूचना सौ.भारती आठरे यांनी केली तर सौ. शोभना चव्हाण यांनी अनुमोदन दिले.सौ शिल्पा वाघ यांच्या नावाची सूचना सौ. आशा मिस्कीन यांनी केली ॲड. विजया काकडे यांनी अनुमोदन दिले.डॉ. दिपाली अनभुले याच्या नावाचे सूचना ॲड. शारदा लगड यांनी केली तर अनुमोदन सौ. शोभाताई खरपुडे यांनी दिले. सौ.आरती मांढरे यांच्या नावाची सूचना प्रा. संध्या जाधव यांनी केली. आणि प्रा. मेधा काळे यांनी अनुमोदन दिले.

यावेळी बोलताना संस्थापिका व विद्यमान संचालिका प्रा. मेधाताई काळे म्हणाल्या की बँकेच्या स्थापनेपासून मरकड ताई व वाघ ताईचे महत्त्वपूर्ण योगदान होते. तसेच पुढील काळात अनभुले व गांगर्डे यांनी बँक चळवळ वाढीसाठी अथक परिश्रम घेतले आहे. त्यांचा त्याग ही नवीन पिढी समोर ठेवून बँक विकासासाठी चालना देईल. निवड करताना उच्च पदवीधर,समाजामध्ये काम करण्याची आवड या गोष्टींचा विचार करण्यात आला आहे.

यावेळी बोलताना अध्यक्ष शांता मोरे म्हणाल्या की आज अखेर बँकेच्या २२५ कोटींचा व्यवसाय असून १३३ कोटी ठेवी व ९१ कोटी कर्ज वाटप आहे. बँकेचा एनपीए ०% राहिला आहे नियमित लेखापरीक्षण ऑडिट वर्ग अ आहे.

बँकेने आरबीआयचे सर्व निकष पूर्ण केले असून पाच शाखांसह संगणक युक्त प्रणालीचा बँक वापर करत आहे. त्यामुळे बँकिंग क्षेत्रात महिला बँकेचा उत्तम कारभार लक्षात घेता यावर्षीचा महाराष्ट्र को-ऑपरेटिव्ह फेडरेशनचा महाराष्ट्रातील राज्यात महिला गटातून सर्वोत्कृष्ट बँक पुरस्कार तसेच देश व राज्यातील अनेक पुरस्कार बँकेला मिळालेले आहेत. कर्ज देताना अतिशय काटेकोरपणे पालन केल्याने बँक चांगल्या स्थितीत असल्याचे उपाध्यक्ष सौ.सुमनताई गोसावी यांनी सांगितले.

यावेळी नवनिर्वाचित संचालिका यांचेही भाषणे झाली. यावेळी बोलताना सहाय्यक उपनिबंधक बाळकृष्ण शिंदे म्हणाले की , महिला एकत्र येऊन सामाजिक भावनेतून महिलांप्रती आदर युक्त करून एक चांगली बँक चालू शकतात याचे उत्तम उदाहरण म्हणजे गेले ३९ वर्ष अविरत चाललेली अंबिका महिला बँक आहे. हे चळवळ नसून महिलांना आर्थिक पाठबळ देणारी एक आधार संस्था आहे. याचा आम्हाला अभिमान आहे.

यावेळी ज्येष्ठ संचालिका सौ.सरोजिनी चव्हाण, सी.ए. ज्ञानेश्वर काळे, कार्यकारी अधिकारी अंकुश गायकवाड,या मराठा पतसंस्थेचे संचालक किशोर मरकड, अभिजीत वाघ, शहर बँकेचे संचालक डॉ. भूषण अनभुले, प्रा.सुनील मांढरे,प्रा. राजेंद्र साबळे, नितीन मरकड.शिक्षक बँकेच्या अधिकारी शुभांगी मरकड आदी मान्यवर उपस्थित होते.

साईदीप सहयाद्री हॉस्पिटल, अहिल्यानगर आणि अहिल्यानगर महानगरपालिका यांच्या वतीने

ॲड. अवधुत भगवानराव फुलसौंदर यांच्या वाढदिवसानिमित्त मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– वैष्णव मित्र मंडळ, फुलसौंदर मळा, बुरुडगाव रोड, अहिल्यानगर यांच्या वतीने ॲड. श्री. अवधुत भगवानराव फुलसौंदर यांच्या वाढदिवसानिमित्त अहिल्यानगर महानगरपालिका आणि साईदीप सहयाद्री हॉस्पिटल, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने आरोग्य तपासणी व औषधोपचार या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

अहिल्यानगर शहराचे विद्यमान आमदार संग्रामभैय्या जगताप यांच्या हस्ते शिबीराचे उद्घाटन गुरुवार, दिनांक - ०६ आगस्ट २०२६ रोजी सकाळी ठीक १०.०० वाजता नक्षत्र लॉन, बुरुडगाव रोड, फुलसौंदर मळा, अहिल्यानगर येथे होणार आहे. या शिबीराची वेळ सकाळी ठीक १०.०० ते सांय. ३.०० वाजे पर्यंत ठेवण्यात आली आहे.

या आरोग्य तपासणी शिबीरामध्ये खालीलप्रमाणे तपासण्या करण्यात येणार आहेत. सामान्य वैद्यकीय सल्ला मधुमेह व हृदय रोग, बालरोग तज्ञ, त्वचारोग तज्ञ, अस्थीरोग तज्ञ इ. उपस्थित राहणार आहेत, तसेच रक्तदाब तपासणी, बी. एम. आय. आणि वजन तपासणी, इ.सी.जी., नेत्र तपासणी, मुत्रपिंड तपासणी, युरिक ॲसिड तपासणी, रक्त तपासणी, लिपीड प्रोफाईल तपासणी, रक्तातील साखरेची सरासरी तपासणी, यकृत तपासणी, थायरॉईड तपासणी, क्षयरोग तपासणी, छातीचा एक्स-रे इ. तसेच महात्मा फुले जन आरोग्य योजने अंतर्गत पात्र लाभार्थ्यांना मोफत शस्त्रक्रियेचा लाभही मिळणार आहे. तरी नगर शहरातील सर्व गरजुनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन वैष्णव मित्र मंडळ व ॲड. अवधुत भगवानराव फुलसौंदर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

डॉ. मीरा ढास यांनी स्वीकारला शिर्डी येथील माहिती अधिकारी पदाचा कार्यभार

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

शिर्डी– राज्य शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या अधिपत्याखालील उप माहिती कार्यालय, शिर्डी येथे प्रशासकीय बदलीने नियुक्त झालेल्या डॉ. मीरा ढास यांनी आज माहिती अधिकारी पदाचा कार्यभार स्वीकारला.

डॉ. ढास या जुलै २००८ मध्ये शासनाच्या माहिती व जनसंपर्क विभागात उपसंपादक म्हणून मंत्रालय, मुंबई येथे रुजू झाल्या. त्यानंतर त्यांनी जिल्हा माहिती कार्यालय, पुणे तसेच विभागीय माहिती कार्यालय, लातूर येथे सहाय्यक संचालक म्हणून कार्य केले. पुढे जिल्हा माहिती कार्यालय, नांदेड येथे जिल्हा माहिती अधिकारी म्हणून त्यांनी जबाबदारी सांभाळली. त्यानंतर त्या जिल्हा माहिती कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे माहिती अधिकारी म्हणून कार्यरत होत्या. तेथून प्रशासकीय बदलीने त्यांची उप माहिती कार्यालय,

शिर्डी येथे माहिती अधिकारी म्हणून नियुक्ती झाली असून त्यांनी आज पदाचा कार्यभार स्वीकारला.

पदभार स्वीकारल्यानंतर डॉ. मीरा ढास यांनी श्री साईबाबा संस्थान, शिर्डीचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. गोरक्ष गाडीलकर यांची सदिच्छा भेट घेतली. यावेळी श्री. गोरक्ष गाडीलकर यांनी त्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला व पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी मनोगत व्यक्त करताना डॉ. मीरा ढास यांनी सांगितले की प्रभावी संवाद कौशल्याच्या आणि विविध समाज माध्यमातून शासनाच्या जन कल्याणकारी योजना व विविध उपक्रमांची माहिती सर्वसामान्य नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचा विश्वास व्यक्त केला. शिर्डी हे ठिकाण श्री साईबाबा यांच्या पावन भूमीमुळे प्रसिद्ध आहे. येथे मोठ्या संख्येने भाविक आणि पर्यटक दर्शनासाठी येत असतात. साई भक्तांसाठी, आणि नागरिकांसाठी शासन विविध स्तरावरून सुविधा उपलब्ध करुन देत आहे. या उपक्रमाला लोकांसमोर सकारात्मक पद्धतीने आणण्यासाठी काम करणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी उप माहिती कार्यालय, शिर्डी येथील कर्मचारी श्री. मंगेश रसाळी व श्री. अभिजीत मुठे यांनी पुष्पगुच्छ देऊन डॉ. मीरा ढास यांचे स्वागत केले तसेच त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

मंगल भक्त सेवा मंडळ ट्रस्टचे समाजामधील गरजवंत विद्यार्थ्यांसाठी बहुमोल योगदान

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– अहिल्यानगर मधील श्री विश्वेश्वर स्वामी महाराज (श्री राजाभाऊ कोठारी) यांच्या मार्गदर्शनातून मंगल भक्त सेवा मंडळ ट्रस्ट च्या वतीने समाजातील गरजवंत मुलांना शैक्षणिक साहित्याचे वाटप जिल्ह्यातील शाळांमध्ये सामाजिक सेवाकार्य म्हणून करण्यात येते.त्यानुसार न्यू इंग्लिश स्कुल, शेंडी, ता. नगर येथील ५० विद्यार्थ्यांना वह्या व २५ विद्यार्थ्यांना शालेय बॅग / दप्तर यांचे वाटप मंगल भाके सेवा मंडळाच्या वतीने श्री बंडूनाना सप्रे, सुनील दळवी, संतोष व्यवहारे सर, अनुमय गुप्ता, प्रीतम गांधी यांचे हस्ते करण्यात आले. या वेळी बंडू नाना सप्रे यांनी ट्रस्ट मार्फत समाजातील अनेक घटकांसाठी राबविण्यात येत असलेल्या उपक्रमांची माहिती सांगितली. सुनील दळवी यांनी शंकर महाराज यांचे कार्या विषयी माहिती सांगितली. यावेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री बाबासाहेब मुळे, वरिष्ठ सहाय्यक श्री. इंगळे सतीश, श्रीम. दरे मॅडम,प्रसाद काळे सर, निलेश म्हसे सर, श्रीम. गावडे मॅडम, अमित इथापे, गोरक्षनाथ तोडमल हे उपस्थित होते... श्री प्रसाद काळे सर यांनी सूत्रसंचालन केले व श्री बाबासाहेब मुळे सर यांनी आभार मानले.

नवगाव-तुळजापूर परिसरात अवैध धंद्यांचा सुळसुळाट?; प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

पैठण– पैठण तालुक्यातील नवगाव व तुळजापूर परिसरात अवैध धंद्यांना ऊत आल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे. नवगाव येथे तीन ठिकाणी तर तुळजापूर येथेही तीन ठिकाणी अवैध देशी दारूची विक्री सर्रास सुरू असल्याची तक्रार करण्यात आली आहे.

याशिवाय नवगाव येथील गुऱ्हाळ परिसरात वीरभद्र नदीकाठी अवैध धंदे सुरू असल्याचा आरोपही नागरिकांनी केला आहे. तसेच नदीपात्रातून अवैध वाळू उपसा व वाहतूक सुरू असून वाळू तस्करांचा हैदोस सुरू असल्याचा दावा करण्यात येत आहे.

वारंवार तक्रारी करूनही संबंधित पोलीस, महसूल व राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून ठोस कारवाई होत नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. त्यामुळे अवैध धंदे करणाऱ्यांचे मनोबल वाढल्याची भावना परिसरात व्यक्त होत आहे. या सर्व प्रकारांची सखोल चौकशी करून अवैध दारू विक्री, वाळू तस्करी व इतर बेकायदा धंद्यांवर तातडीने कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी प्रशासनाकडे केली आहे.

मुकुंद चिलवंत यांनी स्वीकारला अहिल्यानगर जिल्हा माहिती अधिकारी पदाचा कार्यभार

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

अहिल्यानगर– राज्य शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या अहिल्यानगर जिल्हा माहिती कार्यालयाच्या जिल्हा माहिती अधिकारी पदाचा कार्यभार मुकुंद चिलवंत यांनी आज स्वीकारला. यानिमित्त जिल्हा माहिती कार्यालयात साध्या पण उत्साहपूर्ण वातावरणात स्वागत समारंभ आयोजित करण्यात आला होता.

मुकुंद चिलवंत यांना माहिती व जनसंपर्क विभागातील विविध स्तरांवर काम करण्याचा समृद्ध अनुभव आहे. मंत्रालय, मुंबई येथील वृत्तचित्र शाखेत कार्यरत असताना त्यांनी शासनाच्या विविध विकासात्मक उपक्रमांचे प्रभावी दृकश्राव्य दस्तावेजीकरण, जनजागृतीपर माहितीपट निर्मिती तसेच जनसंपर्कविषयक विविध उपक्रमांमध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यानंतर त्यांनी छत्रपती संभाजीनगर

येथे जिल्हा माहिती अधिकारी म्हणून यशस्वीपणे जबाबदारी सांभाळली. अहिल्यानगर येथे पदभार स्वीकारण्यापूर्वी ते सिंधुदुर्ग जिल्ह्याचे जिल्हा माहिती अधिकारी म्हणून कार्यरत होते. त्यांच्या प्रशासकीय अनुभवामुळे तसेच प्रभावी संवादकौशल्यामुळे शासनाच्या जनकल्याणकारी योजनांचा प्रचार-प्रसार अधिक प्रभावीपणे होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

कार्यभार स्वीकारल्यानंतर श्री. चिलवंत यांनी कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांशी संवाद साधला. शासनाच्या विविध योजना, उपक्रम आणि निर्णयांची माहिती नागरिकांपर्यंत अधिक वेगाने, अचूकपणे व परिणामकारक पद्धतीने पोहोचविण्यासाठी सर्वांनी समन्वयाने कार्य करण्याचे आवाहन त्यांनी केले. तसेच प्रसारमाध्यमांशी सुसंवाद राखत माहिती विभागाची विश्वासार्हता अधिक बळकट करण्यासाठी कटिबद्ध असल्याचे त्यांनी नमूद केले.

जलसंपदा मंत्री विखे पाटील ५ ऑगस्टला घेणार कुकडीवसीना प्रकल्पाचा आढावा

शेतकऱ्यांशी संवाद आणि कामांची करणार पाहाणी

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

कर्जत– राज्याचे जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली कुकडी व सीना प्रकल्प लाभक्षेत्रातील विविध विकास कामांचा आढावा घेण्यासाठी बुधवार, दिनांक ५ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता कर्जत येथील कुळधरण रोडवरील शिवपार्वती मंगल कार्यालयात महत्त्वपूर्ण आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. या बैठकीस कुकडी व सीना प्रकल्प लाभक्षेत्रातील शेतकरी, कार्यकर्ते आणि पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असून, प्रकल्पाशी संबंधित विविध प्रश्न, सिंचन व्यवस्था, कालव्यांची दुरुस्ती तसेच लाभक्षेत्रातील विकास कामांचा सविस्तर आढावा घेतला जाणार आहे.

यापूर्वी मंत्री राधाकृष्ण विखे पाटील सकाळी ९.३० वाजता राशीन येथील श्री जगदंबा देवी मंदिरात दर्शन घेणार आहेत. त्यानंतर होलेवाडी, चिलवडी आणि कोळवाडी परिसरात अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या कालव्यांच्या दुरुस्तीच्या कामांची प्रत्यक्ष पाहणी करून स्थानिक शेतकऱ्यांशी संवाद साधणार आहेत. या भेटी दरम्यान शेतकऱ्यांच्या अडचणी जाणून घेत त्यावर आवश्यक उपाययोजनांबाबत चर्चा होणार आहे.

तसेच सकाळी ११.३० वाजता कर्जत येथे जिल्हा अतिरिक्त सत्र न्यायालयाच्या नवीन इमारतीस प्रशासकीय मान्यता मिळाल्याबद्दल बार कौन्सिलच्या वतीने ना. राधाकृष्ण विखे पाटील यांचा सत्कार करण्यात येणार आहे. त्यानंतर ते कर्जत येथील ग्रामदैवत श्री संत सद्गुरू गोदड महाराज यांच्या समाधीस्थळी दर्शन घेतील.

यानंतर शिवपार्वती मंगल कार्यालयात आयोजित कुकडी व सीना प्रकल्पाच्या आढावा बैठकीत सिंचन, कालवा दुरुस्ती, पाणी वितरण, प्रलंबित कामे आणि शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांवर सविस्तर चर्चा होणार आहे. या बैठकीस प्रकल्प लाभक्षेत्रातील सर्व शेतकरी, कार्यकर्ते आणि पदाधिकारी यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

(पान १ वरून)

जिल्हा पोलीस दलातर्फे गुरुवारी अंमली पदार्थविरोधी जनजागृती रॅली

जाणीव निर्माण करणे आणि तरुणांना अंमली पदार्थांच्या धोक्यांपासून सावध करणे हा या रॅलीचा मुख्य उद्देश आहे. या जनजागृती रॅलीमध्ये सहभागी होण्यासाठी जिल्ह्यातील शाळा-महाविद्यालयांचे विद्यार्थी, वकील, पत्रकार, लोकप्रतिनिधी, डॉक्टर, शांतता समितीचे सदस्य, सर्वधर्मीय धर्मगुरू, सायकलींग संघटना, क्रीडा संघटना, विविध सामाजिक संस्था आणि आम नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे.

खासगी प्रवासी वाहतूक आणि वाहतूक शिस्तीबाबत संयुक्त बैठक घेऊन कायमस्वरूपी तोडगा काढणार - आमदार संग्राम जगताप

विकासाबरोबरच शहराच्या वैभवशाली इतिहासालाही आमदार जगताप यांनी न्याय दिला आहे. प्रोफेसर कॉलनी चौकात धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या भव्य पुतळ्याचे अनावरण, मार्केट यार्ड चौकातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे नूतनीकरण व सुशोभीकरण, तसेच शहरातील विविध राष्ट्रपुरुषांच्या पुतळ्यांचे संवर्धन करून शहराचा सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारसा अधिक समृद्ध केला आहे. भोसले आखाडा परिसरातील सुमारे ३० कोटी रुपयांच्या आधुनिक रुग्णालयामुळे आरोग्य सुविधाही अधिक सक्षम होणार आहेत. उड्डाणपूलाच्या कामातही आमदारांनी मोलाचे सहकार्य केले असून रिक्षा संघटनेच्या प्रत्येक हाकेला त्यांनी प्रतिसाद दिला आहे.

सत्काराला उत्तर देताना आमदार संग्राम जगताप म्हणाले की, रिक्षा आणि टॅक्सी चालक हा शहराच्या अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा घटक आहे. कोरोना महामारीच्या कठीण काळात अनेक रिक्षाचालकांचे उत्पन्न पूर्णपणे बंद झाले होते. त्या वेळी संघटनेच्या माध्यमातून किराणा किटचे वाटप करण्यात आले, अनेकांना हॉस्पिटलमध्ये बेड उपलब्ध करून देण्यात आले तसेच औषधोपचारासाठी शक्य ते सर्व सहकार्य करण्यात आले. संकटाच्या काळात समाजाच्या पाठीशी उभे राहणे हे लोकप्रतिनिधी म्हणून आपले कर्तव्य असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

आमदार जगताप पुढे म्हणाले की, शहरातील वाहतूक व्यवस्थेचा प्रश्न कायमस्वरूपी सोडविण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणांना एकत्र आणले जाईल. प्रायव्हेट प्रवासी वाहतूक करणाऱ्या रिक्षा, क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांमुळे अपघाताचा धोका वाढत आहे. तीन प्रवाशांचा परवाना असताना दहा-दहा प्रवासी वाहतूक करणे अत्यंत धोकादायक आहे. अपघात झाल्यास संबंधित चालकावर मोठी आर्थिक जबाबदारी येऊ शकते. तसेच इम्पेरियल चौक, माळीवाडा, लक्ष्मीमाता मंदिर परिसर, स्वास्तिक चौक, बसस्थानक परिसर आदी ठिकाणी रस्त्यावर आडव्या-तिडव्या किंवा दुहेरी रिक्षा उभ्या केल्यामुळे वाहतूक कोंडी होते. त्यामुळे वाहतूक शिस्त पाळणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी संघटनेचे सरचिटणीस अशोक औशीकर, सह सरचिटणीस जुनेद लतीफ बागवान, खजिनदार गणेश आटोळे, संघटक सोपान दळवी, किशोर कुलट, अन्वर शेख, बाळासाहेब साळवे, सागर लांडे, फारुखभाई, गोरख खांदवे, मारूकभाई, किशोर खुडे, लक्ष्मण ढगे, गणेश खाडे, सतीश मोबाळ, सुनील ढोले, सुनील खर्पे, शाहू लंगोटे, आशिष दांगडे, भोला शिंदे, वसंत मोकाटे, प्रकाश तोरडमल, गोरख आंबेकर, केशव बरकते यांच्यासह रिक्षा व टॅक्सी चालक-मालक संघटनेचे शेकडो सदस्य उपस्थित होते. कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

अल्पसंख्याकांच्या विकासासाठी खा. लंके आक्रमक

उंचावण्यास मोठी मदत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी कौशल्य विकास केंद्रांना विशेष प्राधान्य देण्याची आवश्यकता असल्याचेही खासदार लंके यांनी अधोरेखित केले आहे. उद्योगांच्या गरजेनुसार प्रशिक्षण उपलब्ध झाल्यास अल्पसंख्याक समाजातील युवक-युवती स्वयंरोजगार आणि रोजगाराच्या नव्या संधी निर्माण करू शकतील, असे त्यांनी नमूद केले आहे. शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रात भक्कम पायाभूत सुविधा उभारणे ही काळाची गरज असल्याचे सांगत त्यांनी ग्रामीण आणि उपेक्षित भागांतील विद्यार्थ्यांना दर्जेदार शैक्षणिक वातावरण उपलब्ध करून देण्याबरोबरच सर्वसामान्य नागरिकांना त्यांच्या परिसरातच दर्जेदार आरोग्य सेवा मिळण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

अल्पसंख्याक समाजाचा विकास हा केवळ पायाभूत सुविधांपुरता मर्यादित नसून सामाजिक समावेशन, शैक्षणिक प्रगती, आर्थिक स्वावलंबन आणि जीवनमान उंचावण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व घटकांचा समन्वय साधणे गरजेचे असल्याचे खासदार लंके यांनी निवेदनात स्पष्ट केले आहे.

केंद्र सरकारने या मागणीचा सकारात्मक विचार करून पीएमजेव्हीके योजनेंतर्गत आवश्यक निधी तातडीने मंजूर केल्यास अहिल्यानगर (दक्षिण) लोकसभा मतदारसंघातील अल्पसंख्याक बहुल भागांच्या विकासाला मोठी चालना मिळेल. तसेच हजारो नागरिकांना शिक्षण, आरोग्य, पिण्याचे पाणी, स्वच्छता, रस्ते आणि रोजगाराभिमुख प्रशिक्षणाच्या सुविधा उपलब्ध होऊन त्यांच्या जीवनमानात गुणात्मक सुधारणा होईल, अशी अपेक्षा खासदार नीलेश लंके यांनी व्यक्त केली आहे.

शेतातील महिलांचे दागिने लांबविणारी टोळी जेरबंद

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली पो.नि. संतोष मुटकुळे व पथकाने तांत्रिक विश्लेषणाद्वारे तपास सुरू केला.

दिनांक ३ऑगस्ट रोजी मिळालेल्या माहितीनुसार मेहेरबाबा समाधी परिसरात सापळा रचून नितीन जपकर चव्हाण (वय ४५) आणि रोहित नितीन चव्हाण (वय २०, दोघे रा. केडगाव) यांना ताब्यात घेण्यात आले, तर सुमित चव्हाण हा पळून गेला. आरोपींकडून दोन मोटार सायकल, तीन मोबाईल व चाकू असा १ लाख ३० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. चौकशीत चोरीचे सोने विकण्यास मदत करणारा विपुल अशोक टगारे (वय २६, रा. केडगाव) यालाही पोलिसांनी पकडले. त्याच्याकडून २० हजारांचे मोबाईल आणि संबंधित सोनाराकडून ३ लाख १ हजार रुपये किमतीची २१.५ ग्रॅम वजनाची सोन्याची लगड जप्त करण्यात आली. या आरोपींच्या अटकेने नगर तालुका पोलीस ठाण्यातील तीन व मिरजगाव येथील एक असे चार गुन्हे उघडकीस आले आहेत.

वैद्यकीय क्षेत्रात एम.आर.चे महत्वपूर्ण योगदान - डॉ. आशिष भंडारी

गोष्ट आहे. आनंदऋषीजी मेडिकलने कायम सहकार्य आणि पाठबळ दिले आहे, अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या. आभार मानताना पियुष मंडलेचा म्हणाले, अतिशय व्यस्त काम असताना एम.आर.नी आवर्जून या कार्यक्रमासाठी वेळ काढला यासाठी आभारी आहे. भविष्यात आनंदऋषीजी हॉस्पिटल व एम.आर. एकमेकांच्या समन्वयाने समाजासाठी भरीव कार्य करण्याचा प्रयत्न करतील. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिव्या कलमदाने यांनी केले.